# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. ०८/०३/२०१७

## *गोडलवाही येथे जागतिक महिला दिन साजरा*

आज दिनांक ०८/०३/२०१७ रोजी पोमके गोडलवाही येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला शशक्तिकरण विषयासंबंधी कार्यक्रम आयोजीत करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात गोडलवाही गावातील २०० महिला उपस्थित होत्या. तसेच पोमकेच अधिकारी पोउपनि. श्री. सरडे, श्री. खाडे, व एस.आर.पी.चे पोउपनि. श्री. मडावी तसेच गोडलवाही ग्रामपंचायत ग्रामसेवक पोटावी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित महिलांना जिल्हा पोलीस महिला कर्मचारी यांनी पुष्प गुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोडलवाही गावच्या ग्रामपंचायत सदस्या बबीता उसेंडी या होत्या. त्यानंतर पोउपनि. खाडे यांनी उपस्थित महिलांना घटनेनी दिलेली हक्क व कायदेशिर हक्क तसेच महिला शशक्तिकरण व स्वय:सहायता बचत गट इत्यादी बाबतची माहिती दिली व कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थित महिलांनी स्वत:चा विकास करु व सामाजिक विकासामध्ये महत्वाची भुमिका पार पाडण्याची शपथ घेतली व कार्यक्रमाची सांगता झाली.



